तरुण भारत
सोमवार १४ मार्च २०२२

# दोडामार्ग येथील हळबे महाविद्यालयात अन्न महोत्सव



**दोडामार्ग : हळबे महाविद्यालयातील अन्न महोत्सवाच्या उद्‍घाटनप्रसंगी उपनगराध्यक्ष देविदास गवस. सोबत प्राचार्य डॉ. सुभाष सावंत व इतर.**

**दोडामार्ग :** येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयाच्या आजीवन अध्ययन विस्तार विभागाच्या अन्न महोत्सवाचे उद्‍घाटन कसई–दोडामार्गचे उपनगराध्यक्ष देविदास कृष्णा गवस यांच्या हस्ते झाले. अन्नमहोत्सवासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या घरातूनच अनेक प्रकारचे खाद्यपदार्थ बनवून आणले होते. यावेळी प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, प्रा. डॉ. संजय खडपकर, हॉटेल मॅनेजमेंट विभागाचे गौरीश कर्पे, आजीवन विस्तार विभागाचे समन्वयक प्रा. डॉ. सोपान जाधव, प्रा. श्रीपाद पाडगावकर, व महाविद्यालयाचे कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.